नि.फौ.ख.क्र.१९३/२०२५

सरकार -वि- दिनेश **नि.क्र. १४**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – पुष्पा दिनेश पिंपळकर

वय. ३० वर्षे, व्यवसाय – घरकाम,

निवासस्थान – मुरली, ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील यांच्या मार्फत –</u>**

मी आरोपीला ओळखते. ते माझे पती आहे. घटनेला तीन चार महिने झाले असतील. त्यादिवशी आरोपी व त्याचा भावाचा झगडा झाला होता. मी मध्ये गेली असता माझा पाय घसरला, मी दगडावर पडले व मला डोक्याला जखम झाली होती. त्यामुळे मी बेशुध्द झाली होती. मी पोलिस ठाण्यात गेली नव्हती. पोलिसांनी माझा जबाब दवाखान्यात घेतला होता. आता मला माझा जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझा निशाणी अंगठा आहे. त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. निशाणी अंगठ्यास ओळखीसाठी **निशाणी १५** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सहीस ओळखीसाठी **निशाणी १६** देण्यात येते. असे काही घडले नाही की, आरोपीने दारूच्या नशेत वीट फेकुन मारल्यामुळे मला जखम झाली होती. असे काही घडले नाही की, आरोपीने मला शिवीगाळ करून माझा अपमान केला होता.

**साक्षीदार अभियोग पक्षाच्या प्रकरणास दुजोरा देत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येत आहे.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.०७.२०२५ रोजी मुरली गांवी आरोपीने मला दारूच्या नशेत वीट फेकुन मारल्यामुळे मला गंभीर दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला शिवीगाळ करून शांतता भंग करण्यास प्रोत्साहीत केले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझा जबाब दवाखान्यामध्ये नोंदविला होता. हे म्हणणे खरे

नाही की, मी पुर्ण शुध्दीत पोलिसांना जबाब दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्याकरीता मी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. गहाणे यांच्या मार्फत</u> –**

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व मी पती पत्नी असुन आम्ही सोबतच राहत आहोत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्यामध्ये चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझ्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. २०.०४.२०२६ | दि.२०.०४.२०२६ |